सोबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय कार्यालयाचे दिनांक १७/१०/२०२५ रोजीचे पत्र क्र.DTEM-D१७०TEQP/१७३/२०२५-DESK१७ अन्वये **भारत सरकारच्या बंदरे, नौकावहन व जलमार्ग मंत्रालयामार्फत आयोजित "इंडिया मेरिटाईम बीक २०२५" या राष्ट्रीय उपक्रमाबाबत** या मोहिमेमध्ये सहभागी होण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर मोहिमेमध्ये सहभागी होण्याबाबत व सदर कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सविस्तर माहितीपत्र सोबत जोडले असून सदर पत्रासोबत जोडलेल्या पत्रान्वये कार्यवाही करण्यात यावी तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

पृष्ठांकन क्र: तंशिविकाअ/शिक्षण/२०२५/2905
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दिनांक.- 17/10/2025

**प्रति,**

प्राचार्य, सर्व व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमांच्या संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्रात दिल्यालेल्या सुचनेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(मनोज म. अंधारे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

प्रत :- **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

Endos

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४९/४६६/४१९

ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक :DTEM-D170TEQP/173/2025-DESK17 दिनांक : १७ ऑक्टोबर, २०२५

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर

विषय: **भारत सरकारच्या बंदरे, नौकावहन व जलमार्ग मंत्रालयामार्फत आयोजित "इंडिया मेरीटाइम वीक २०२५" या राष्ट्रीय उपक्रमाबाबत.**

संदर्भ: Indian Ports Association यांचे पत्र क्र. D.O.No: IPA/ invitation/IMW/2025/1072, Dated: 14/10/2025

भारत सरकारच्या बंदरे, नौकावहन आणि जलमार्ग मंत्रालयामार्फत "इंडिया मेरीटाइम वीक २०२५" हा राष्ट्रीय उपक्रम दिनांक २७ ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सागरी वारसा, उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि पर्यावरणीय शाश्वततेबाबत जागरूकता निर्माण करणे असून, सदर कार्यक्रमामध्ये भारतातील उद्योजक, शैक्षणिक संस्था व धोरणकर्ते सहभागी होणार आहेत. वरील उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सागरी क्षेत्रातील नवोन्मेष, संशोधन आणि कौशल्यविकास वाढविण्यास उपयुक्त ठरेल. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या संस्थांनी Innovation & Technology, Sustainability & Environment, Heritage & Culture या विषयांवरील मॉडेल्स, पोस्टर्स, डिजिटल कंटेंट इत्यादी माध्यमांतून सादरीकरण करावयाचे असून, सहभागी संस्थांना नोंदणी शुल्क, प्रदर्शन क्षेत्र (९ चौ. मी. जागा) तसेच विद्यार्थ्यांसाठी आयोजित सत्रांमध्ये मोफत सहभागाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

याबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागा अंतर्गत येणाऱ्या सर्व पदवी/पदविका संस्थांतील इच्छुक अध्यापक/विद्यार्थ्यांना Indian Ports Association (IPA) द्वारे आयोजित या कार्यक्रमात सहभाग घेण्याबाबत सूचित करावे.

सदर कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी खालील लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

https://imw.org.in/delegates/express-delegate/

तसेच प्रशिक्षणांबाबत अधिक माहितीसाठी खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा:

- श्री. प्रेम पिल्लई, Head Officer (Procurement & Projects), Indian Ports Association, नवी दिल्ली.
  ई-मेल: prem.mpt@gmail.com दूरध्वनी: ९८२२३८८८४१

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत:**

१. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - माहितीस्तव.
२. श्री. प्रेम पिल्लई, Head Officer, Indian Ports Association, नवी दिल्ली - माहितीस्तव.